भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६ /०१/२०१७

**१) विद्युत मोटार पंपची चोरी. :—**

दिनांक ०४+०५/०१/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी लोकेश्वर रामचंद्र पारधी वय ५८ वर्ष, रा. मचेरा याचे शेताजवळील नाल्यावर लावलेली २ एचपी सीआरआय कंपनीची विद्युत मोटार पंप कि. ६,०००/—रु. कोणीतरी चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन वाहनाचे मालका ऐवजी बनावटी वाहनाचे कागदपत्र दुसरे इसमास पेश करुन कोर्टाची दिशाभुल केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक०३/१२/२०१६ चे १३.००वा. पासुन ते २८/१२/२०१६ चे १६.०० वा. दर. यातील आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन पोस्टे साकोली येथे नोंद अप क्र. १४०/१६ कलम ४०७, ११७ भांदवि मध्ये जप्त ट्रक क्र. जीजे ०५ बियु ०१६७ सुपृनाम्यावर मिळावे म्हणुन वाहनाचे मालका ऐवजी दि. ३/१२/२०१६ रोजी दुसरे इसमास कोर्टा समक्ष पेश केले तसेच दि. २८/१२/२०१६ रोजी मालका ऐवजी अप क्र. १४०/१६ मधील आरोपी क्र. ३ यास न्यायालया समक्ष हजर करुन वाहनाचे मुळ मालकाचे कागदपत्रे सादर करुन व बनावटी स्वाक्षरी करुन न्यायालयाची दिक्षा भुल व फसवणुक केली अश्या फिर्यादीचे तक्रारीवरुन व मा. दिवानी न्यायाधीश क.स्तर यांचे लेखी आदेशावरुन पोस्टे साकोली येथे कलम ४२०,४६८,४७१,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गावंडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी चालकास धडक देवुन गंभिर जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे १८.३५ वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रस्त्याने पायी जाणाऱ्या अनोळखी इसम वय अंदाजे ५० वर्ष, यास धडक मारुन गंभिर दुखापत करुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने डॉ. मेमो व चौकशी रिपोर्ट वरुन पोस्टे वरठी कलम २७९, ३३८,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. हलमारे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०५/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, तुमसर व साकोली येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९ लिटर हा.भ. दारू कि १,३००/—रू. व ५०० मीलीलीटर देशी दारू कि. १५०/—रू असा एकुण १,४५०/—रू जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५९०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.